# 'गोल्डन रिट्रेट' गोव्याच्या पर्यटन व्यवसायात आणखी एक दालन

पणजी, २१ ऑगस्ट (प्रतिनिधी) गोवा एक नैसर्गिक ठेवा असलेले राज्य असून, गोव्याची सुंदरता तथा सृष्टीसौंदर्य पाहण्यासारखे असल्यामुळेच गोव्यात आज हजारो पर्यटक येत असतात. गोव्याच्या भूमीत आगळावेगळा उपक्रम राबविण्याच्या उद्देशाने मुंबईस्थित तथा गोव्यात स्थायिक झालेल्या पॅलासियो या कंपनीने 'गोल्डन रिट्रेट' नावाने एक विश्रांतीगृहाची स्थापना करून एक वेगळे उदाहरण जगाला दाखवून दिलेले आहे.

'गोल्डन रिट्रेट' हा उपक्रम संपूर्ण भारतातील पहिलाच महत्त्वाचा धाक असून, सर्व सुखसोयींनीयुक्त अशी विश्रांतीगृहाची योजना त्यांनी आखली आहे. सदर विश्रांतीगृह सिरीदाव नदीच्या काठावर उभारण्यात आले असून, त्या ठिकाणी सर्व तऱ्हेच्या फाईव्ह स्टार हॉटेलप्रमाणेच सुखसुविधा असून, राहण्याची सोय पण त्या ठिकाणी करण्यात आली आहे. गोल्डन रिट्रेटची निर्मिती साडेदहा एकर जमिनीत करण्यात आली असून, त्या ठिकाणी शांत वातावरण, निव्वागार प्रदेशात प्रसन्नतेने राहता येईल, अशी सोय करण्यात आल्याची माहिती पॅलासियो ग्रुपचे संस्थापक विनय भसिन यांनी दिली. त्या ठिकाणी सर्व सुविधा प्रामुख्याने स्विमिंग पूल, योगा, खेळण्याची सुविधा, डॉक्टरची सुविधा तसेच सार्वजनिक जीवनाला उपयुक्त सर्व घटकांची तेथे सोय करण्यात आली आहे.

गोल्डन रिट्रेट हे विश्रांतीगृह दाबोळी विमानतळ तसेच पणजी शहरापासून जवळ असून, सिरीदाव व बांबोळी समुद्रकिनाऱ्याच्या सौंदर्याचा आनंद लुटता येईल, असे मत विनय भसिन यांनी व्यक्त केले.

अशाच प्रकारचे प्रकल्प पॅलासिओ ग्रुपने एन. सी. आर. पुणे, लावासा तथा दक्षिण भारतात पण चालू केले आहेत. मुंबईत ३० लाख एकर जमिनीत पॅलासियो ग्रुपचा व्यवसाय चालू असून, गोव्यात प्रथमच अशा प्रकारचा प्रकल्प उभारला असल्याची माहिती विनय भसिन यांनी दिली.

GOA TIMES
22nd August 2009